They are blessed with two kids, Aarav and Sara.

रो. रश्मी परुळकर
(डिरेक्टर सर्व्हिस प्रोजेक्ट्स - युथ अँड पार्टनर्स इन सर्व्हिसेस)




रश्मी मूळची नागपूरची. तिचे सगळे शिक्षण नागपूरमध्ये पूर्ण झाले. ती आर्किटेक्ट असून तिने आर्किटेक्चर ऑफ मास्टर्समध्ये डिस्टिंक्शन मिळवले आहे आणि डिझाईनमध्ये सुवर्णपदक मिळवले आहे.

रश्मी १९९६ साली पुण्यात आली. तेवीस वर्षांपासून तिची ‘सँक्टम डिझाईन’ नावाची कन्सल्टन्सी फर्म आहे. तिने थोड्याच अवधीत व्यवसायात उत्तम जम बसवला. अनेक कार्पोरेट ऑफिसेसचे, बंगलोज्चे आणि फ्लॅट्सचे सर्वोत्तम प्रतीचे डिझाईन बनवून खूप सुंदर इंटिरिअर केले आहे.

उत्तम काम करून ग्राहकाचे समाधान आणि विश्वास मिळवला आहे. तिच्या कामात एक वेगळेपणा निश्चित जाणवतो, आपण त्याला रश्मी टच म्हणू शकतो. तिच्या क्वालिटी वर्कमुळेच तिने ‘रचना डिझायनर्स’ नावाची आणखी एक स्वतःची कंपनी स्थापन केली आहे. अशी ही हरहुन्नरी सामाजिक भान असणारी रश्मी.

रश्मीचा नऊ वर्षांचा मुलगा शर्व. तो सध्या चौथीत बिशप

हायस्कूलमध्ये शिकत आहे. तो ॲथलीट असून त्याने आत्तापर्यंत अनेक सुवर्णपदके मिळवली आहेत. तसेच त्याने १५ किलोमीटर सायकल चालवून एक वेगळा विक्रम नुकताच केला आहे.

## Rtn. P.P. Govind Patwardhan
(Club Trainer)



Advocate and tax consultant
Practicing since 1973.
Nominated on advisory committee for VAT.
Member of GST discussion group of Govt of Maharashtra.
Author of 8 books mostly related taxation.
Editor of tax tribune for 5 years.

### Rotary
A) Joined Rotary in 1980.
B) Worked on almost all committees covering four avenues (avenues) of services.
C) Editor of Southern Star three times.
D) Recipient of club awards such as Best bulletin, Best Rotarian, Best Committee, Best Vocational service projects, Rotary family of the year, Participation in District events. Etc.
E) '4 avenue service award' of Rotary International in 2001-02.
F) Convenor of Council of presidents in 1998-99

### District assignments
a) Editor of Governor's Monthly letter - 1090-91 2004-05
b) Editor of Foundation Newsletter - 2002-03
c) Chairman of District Ryla Committee - 1095-96
d) Director - Youth services - 1996-97
e) Director - Club Services - 2001-02
f) Director/Co-director of Strategic Planning Committee - 2014-15, 2015-16 2016-

Wife Charushila is interested in music, cooking, bharatkam.
She has cleared many singing exams of Gandharv Mahavidhyalay.
She has independently done programs of Geetramayan of Ga Di Madulkar.
Speaker on the bulletin, magazine month, strategic planning, club services at various seminars, club meetings.

रो. आनंद कुलकर्णी
(सार्जंट ॲट आर्म्स)



आनंद हा माइंड कोच, ट्रेनर आणि सायकॉलॉजिस्ट आहे.

त्याने बीई मेकॅनिकल आणि एमबीए केलेले आहे. त्याचबरोबर काउन्सेलिंग सायकॉलॉजीमध्ये मास्टर्सपण केले आहे. त्याला बावीस वर्षांचा इंडस्ट्री, ट्रेनिंग अणि कन्सल्टिंग यांचा अनुभव आहे. मानवी मनाशी निगडित अनेक प्रणालींत त्याने प्रावीण्य मिळवलेले आहे. भारताबरोबर ब्रिटन, कॅनडा अशा देशांमध्येही त्याने काम केले आहे. त्याचे समुपदेशन केंद्र टिळक रोडजवळ आहे.

त्याची पत्नी ॲन अपर्णा आयटी इंजिनिअर आहे आणि सध्या त्याला त्याच्या कामात मदत करते.

रो. अभिजित देशपांडे
(आय. टी. ऑफिसर)



अभिजित हा २०१९ पासून रोटरी सदस्य आहे. तो गेली बावीस वर्षे विविध व्यावसायिक क्षेत्रांत कार्यरत आहे. चीझ मेकिंग, व्यावसायिक लाँड्री, नैसर्गिक शेती आणि माहिती तंत्रज्ञान अशा विविध क्षेत्रांत त्याने यशस्वी उद्योग उभारले आहेत. सर्वविद सॉफ्टवेअर आणि बेसिक सेन्स टेकनॉलॉजीज् या त्याच्या मुख्य कंपन्या आहेत. भारत व मलेशिया येथील विविध विद्यापीठांत त्याने IOT आणि Industry ४.O (आयओटी आणि इंडस्ट्री फोर पॉइंट ओ) यांविषयी विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत.

कोविड-१९ मध्ये ब्ल्यूटुथ तंत्रज्ञान वापरून 'Digital Contact Tracing' अर्थात बाधित व्यक्तीच्या संपर्कात आलेल्या लोकांचा शोध घेणे याविषयी जागतिक प्रमाण व मानके ठरवणाऱ्या Bluetooth SIG (ब्ल्यूटुथ एसआयजी) या समितीमध्येदेखील तो सध्या कार्यरत आहे.

तो उत्तम शेफ आहे आणि विविध कॉकटेल्स बनवणे ही त्याची खासियत आहे.

त्याची पत्नी ॲन माधवी ही अर्थशास्त्राची पदव्युत्तर आहे. तसेच instructional design d natural farming यांचे प्रशिक्षण घेतलेले आहे. लहान मुलांसाठी सोपे आणि त्यांना शिकताना मजा येईल असे शैक्षणिक साहित्य ती तयार करते. तसेच बेकिंग आणि नैसर्गिक साबण बनवणे या विषयांच्या कार्यशाळा देखीलघेते. क्रोशे विणकामाचा तिला विशेष छंद आहे. या वर्षी रोटरीच्या माध्यमातून पर्यावरणाविषयी भरीव काम करण्याचा तिचा मानस आहे.

क्लबकारी

- अध्यक्ष सुदर्शन संवाद
- विविध विभाग संचालक किंवा कमिटी मुख्य संवाद
- क्लबमधील विविध प्रोजेक्टस, कार्यक्रम, फेलोशिप्स
- जावे त्यांच्या क्षेत्रा... / मागील एखाद्या प्रोजेक्टची गोष्ट

तुमचा लेख आवर्जून द्या...
समन्वयक - एके / यामिनी

हे सदर इ-बुलेटिनमध्ये वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा...

# कलाकारी

## माझे जीवनगाणे

रो. मृदुला घोडके

सुशांतसिंग राजपूत या हिंदी चित्रपट अभिनेत्याच्या आत्महत्येच्या बातमीनं रविवारी संपूर्ण देश हादरून गेला. विशेषतः युवा पिढी अस्वस्थ झाली. अशा गुणी, हरहुन्नरी, स्वकर्तृत्वाच्या बळावर यशस्वी झालेल्या, आपल्यासारख्या सामान्य कुटुंबातला असूनही बॉलिवूडमध्ये जम बसवलेल्या या उच्चशिक्षित मुलानं असं टोकाचं पाऊल का उचलावं? हे एक मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. आत्यंतिक निराशेपोटी त्यानं आपलं जीवन संपवल्याचं समोर आलं आहे. 'निराशा'... निराशा वाढवणाऱ्या अशा बातम्या अलीकडे तीनचार महिन्यांत सर्वच प्रसारमाध्यमांतून आपण बघत आहोत. त्यांचा इतका अतिरेक झालाय की, खळखळून मनमोकळं हसण्याची भीती वाटायला लागली आहे.

तोंडावर लावलेल्या मास्कच्या आडूनही ही निराशा, भीती डोकावतेय. निराशा, औदासीन्य, स्वतःबद्दल हीन भावना या गोष्टी आपल्या जीवनात प्रवेश करतात तरी कशा? खूप आधी ऐकलेली एक गोष्ट मला इथं आठवतेय..... एकदा एक प्राध्यापक हातात एक काचेचा ग्लास घेऊन वर्गात येतात. ग्लासात पाणी असतं.

हातातला ग्लास उंचावून ते विद्यार्थ्यांना विचारतात 'या ग्लासात किती पाणी आहे असं तुम्हाला वाटतं...?'

विद्यार्थी वेगवेगळे अंदाज लावतात. नंतर प्राध्यापक विचारतात 'हा ग्लास मी असाच तासभर उंच धरून ठेवला तर काय होईल?'

'तुमचा हात दुखायला लागेल' विद्यार्थी म्हणाले.

'हा ग्लास मी हातात असाच जर दिवसभर उंच धरून ठेवला तर काय होईल?'

'सरऽऽ तुमचा हात बधिर होईल, कदाचित पॅरालिसीस होऊ शकतो... तुम्हाला हॉस्पिटलमध्ये जावं लागेल.'

'अगदी बरोबर! पण त्यामुळे हातातल्या ग्लासचं वजन कमी होईल का?'

'अजिबात नाही...' विद्यार्थी.

'पण मग माझ्या हाताला इतकी इजा का व्हावी?'

'सरऽ तुम्ही ग्लास खाली ठेवलाच नाही. तो तसाच वर धरून ठेवलात...' एक हुशार विद्यार्थी चटकन उत्तरला.

'अगदी बरोबर!' प्राध्यापक म्हणाले.

आपल्या जीवनातल्या समस्यांबाबतही असंच काही म्हणता येईल. तुमच्या अडचणी, समस्या थोड्या वेळासाठीच तुमच्या जवळ ठेवल्या तर ठीक... पण तुम्ही त्यांना कवटाळून बसलात, त्या बाजूला सारल्याच नाहीत; तर त्या समस्या तुमचं जीवन उद्ध्वस्त करू शकतात. तुम्हाला पोखरून काढू शकतात... त्या समस्यांवर मात करण्याची, त्यांतून मार्ग काढण्याची क्षमता तुम्ही हरवून बसाल...

हंऽऽ ...पण समस्या आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग नाहीत का... कशा ठेवायच्या समस्या बाजूला? असा विचार करत असतानाच पंडित जितेंद्र अभिषेकी यांच्या रेडिओवरच्या गाण्याचे सूर कानांवर पडले... 'माझे जीवनगाणे, व्यथा असो, आनंद असू दे, प्रकाश किंवा तिमिर असू दे, वाट दिसो अथवा न दिसू दे, गात पुढे मज जाणे, माझे जीवनगाणे.'

जीवनात हे असं जगणं कसं जमेल??? अचानक मला 'अनाथांची माय' सिंधुताई सपकाळ आठवल्या... नवऱ्यानं घराबाहेर काढलेल्या, आईनंही थारा न दिलेल्या, गोठ्यात गायीशेजारी आपल्या मुलीला जन्म दिलेल्या आणि चितेवर भाकरी भाजून जीवन जगलेल्या सिंधुताईंनी, जीवनात केवळ संघर्ष आणि संघर्षच पाहिला. काहीही आधार नसलेल्या सिंधुताई आपल्या दुःखाला कवटाळून बसल्या नाहीत तर अनाथांची माय होण्याचं 'जीवनगाणं' गात त्यांनी चौदाशेपेक्षा जास्त अनाथ मुलांची जीवनबाग फुलवली.

दिल्लीत एका एनजीओबरोबर काम करत असताना, उत्तराखंडमध्ये चामौली इथं जाण्याचा प्रसंग आला. तिथे एका छोट्या खेड्यात संध्याकाळी फिरत असताना रस्त्यावर कुठेही शाळकरी मुलं दिसत नव्हती. राहवलं नाही म्हणून तिथल्या एका बाईंना विचारलं. त्यांनी टेकडीवर असलेल्या एका मोठ्या झोपडीकडे बोट दाखवलं.

आम्ही तिथे पोहोचलो तर एक आजोबा मुलांना गोष्ट सांगत होते आणि सगळी मुलं ती गोष्ट ऐकण्यात दंग झाली होती. नंतर आजोबांना विचारलं तर ते म्हणाले 'मला आवडतं या मुलांना गोष्टी सांगायला... सकाळी मी माझ्या शेतात काम करतो आणि संध्याकाळी घरी जाताना या मुलांना गोष्टी सांगतो... त्या गोष्टी इतिहासातल्या, पुराणातल्या महान व्यक्तींच्या नाहीत; तर शून्यातून जग निर्माण केलेल्या, आपल्यासारख्याच सामान्य परिस्थितीतून येऊन असामान्य कामगिरी केलेल्या व्यक्तींच्या असतात... त्यामुळे बऱ्याच मुलांमध्ये आपणही काही करू शकतो असा आत्मविश्वास

निर्माण होतो. काहीतरी वेगळं करण्याचा प्रयत्न ती करतात.'

आजोबांच्या या वर्गातले अनेक विद्यार्थी मोठमोठ्या पदांवर कार्यरत आहेत, काही सनदी अधिकारी आहेत असं आम्हाला तिथल्या लोकांनी सांगितलं. मोठ्या शहरातल्या आधुनिक जीवन पद्धतीची हवा न लागलेल्या, आपल्या खेड्यातल्या, भावी आधारस्तंभ असलेल्या या मुलांना अशा कथा सांगून त्यांच्यामध्ये ते स्फुलिंग चेतवण्याचं 'जीवनगाणं' आजोबांनी स्वीकारलं होतं.

माझी एक मैत्रीण अस्मिता आपटे पुण्यासारख्या सांस्कृतिक समृद्धीचा वारसा लाभलेल्या शहरात राहते. सुखवस्तू कुटुंबातली आहे. स्वतः एक कर्तव्यदक्ष गृहिणी. सुंदर रांगोळ्या आणि पेंटिंग यांमध्ये आकर्षक रंग भरते. स्वरचित कवितांद्वारे भाव-अभिव्यक्ती करते. शाळांमध्ये जाऊन पर्यावरण जतन-जागृती करते. मुलांना जमवून नदीकिनारा स्वच्छ करून येते. घर, नातवंडं सांभाळून अनेक छंद जोपासते. परफेक्शनिस्ट म्हणतो आम्ही तिला. अशी ही अस्मिता मध्ये प्रकृती-अस्वास्थ्यामुळे काही दिवस घरातच अडकून पडली होती... पण स्वस्थ बसली तर तिच्या अस्मितेला ते पटलं पाहिजे ना... बर्फाळ थंडीत देशाच्या रक्षणासाठी कर्तव्यपूर्ती करणाऱ्या जवानांसाठी हातमोजांच्या शंभर- शंभर जोड्या तिनं विणून दिल्या. आपल्या क्षमतेनुसार सामाजिक कार्याच्या यज्ञकुंडात आपल्या वाटेच्या समिधा टाकण्याचं 'जीवनगाणं' अस्मितानं स्वीकारलं आहे.

स्वकेंद्रित न राहता, आपल्या आजूबाजूला आपण बघितलं तर आपलं 'जीवनगाणं' आपल्यालाही सापडेल...

कदाचित; कॉर्पोरेशनच्या शाळेत जाणाऱ्या गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजीची शिकवणी देऊन किंवा एखाद्या खेड्यातल्या किशोरवयीन मुलींना आरोग्य-निगा राखण्याची माहिती देऊन; आपल्या कॉलनीतल्या मुलांना एकत्र करून गडकिल्ल्यांचा फेरफटका मारण्याचा बेत आखून; पर्यावरणाला हानिकारक प्लॅस्टिकच्या बाटल्या गोळा करून त्यात मनोहारी बाग फुलवून; आपल्या परिचयातल्या एकाकी, वृद्ध व्यक्तींची विचारपूस करून... आपल्याला आपलं 'जीवनगाणं' सापडू शकेल.

...तर कुठलं आहे तुमचं 'जीवनगाणं'? ते शोधा.

प्रकाश असो किंवा तिमिर असो... ते 'जीवनगाणं' गात राहा आणि त्या स्वरांनी पुलकित होणाऱ्या, सावरणाऱ्या चेहऱ्यांवरचा आनंद आपल्या जीवनात भरत राहा....

मला चित्रं काढायची गोडी कधी लागली ते आठवत नाही. शाळेत बऱ्याचदा दोनतीन मार्कांनी माझा दुसरा नंबर यायचा. मी नाराज व्हायची... पण चित्रकलेत ते मार्क मी भरून काढायचे आणि माझा पहिला नंबर यायचा म्हणजे माझी चित्रकला तेव्हाही बाकीच्यांपेक्षा बरी असावी.

आमच्या शाळेत सातवीतून आठवीत जाताना चित्रकला किंवा

# माझी चित्रकारी

- ॲन डॉ. गीतांजली पुरोहित



समाजसेवा यांपैकी एक विषय निवडायचा होता... तेव्हा मी चित्रकला विषय निवडला... अगदी माझ्या फास्ट फ्रेंडनं समाजसेवा घेतली तरीसुद्धा! तिला समाजसेवा आवडायची म्हणून नाही; तर तिला चित्रकला अजिबात जमायची नाही म्हणून! पण चित्रकलेचे आमचे देवकर सर... त्यांनी रंगांची गंमत दाखवली. मग मी चित्रकलेच्या परीक्षा दिल्या. सरांच्या आग्रहाखातर एका स्पर्धेसाठी गरुडाचं मोठं चित्र काढलं, छानच जमलं होतं. मग मीच माझ्यावर खूश झाले आणि माझ्या आठवणीप्रमाणे तीच गोष्ट माझ्यात चित्र काढण्याची खरी आवड निर्माण करून गेली. मी एखादं चित्र बघून तसंच रेखाचित्र काढायची.

दहावीच्या परीक्षेत मी उत्तम मार्क मिळवले म्हणून माझ्या बाबांनी मित्रमंडळींना पार्टी दिली होती. त्यात श्री. राजू भुरके यांनी मला पेंटिंगच्या ब्रशचा सेट भेट दिला आणि ती मला सर्वात अधिक आवडलेली भेट होती. जसं वाढदिवसाला आत्या-मामा यांनी भारी किमतीचा फ्रॉक आणला तरी मुलांना खेळच आवडतात... तसेच

मला ब्रश आवडले म्हणजे चित्रकला खरंच आवडत असावी!

दहावीनंतर पुढे काय शिकायचं याची खूप चर्चा होती... तेव्हा बऱ्याच मंडळींनी मला मुंबईला जीडी आर्ट कर असं सांगितलं... 'आर्किटेक्ट हो... तुझं ड्रॉइंग छान आहे...' असाही सल्ला कुणी दिला... पण चित्रकला ही आवड म्हणून कधीही करता येईल असं मला वाटलं आणि मी डॉक्टर होण्याचं ठरवलं! दोन टक्के कमी पडल्यानं एमबीबीएस मिळालं नाही... मग बीएएमएस केलं. लेक घरात राहून साताऱ्यातच डॉक्टर होणार म्हणून आईबाबापण निश्चिंत झाले. मग मात्र चित्रकला मागेच पडली.

पुढे किरणसारखा डॉक्टर आणि अतिशय उत्साही, रसिक असा जीवनसाथी मिळाला. त्याच्याशी लग्न ठरलं आणि पुन्हा एकदा माझी चित्रकला बहराला आली. मार्चमध्ये साखरपुडा आणि मे महिन्यामध्ये लग्न! दोन महिने आम्ही बहुतेक रोज एकमेकांना पत्रं लिहिली... त्यांतली बरीचशी चित्रांकित होती. मीच नव्हे तर किरणनंसुद्धा मला काही चित्रं काढून त्याच्या कल्पना माझ्यापर्यंत पोहचवल्या असा साथीदार मिळाल्यानं मी हरखून गेले. आमच्या आनंदी जीवनाची ती नांदीच होती.

नंतर मात्र माझ्या सर्व कलागुणांना किरणनं वारंवार प्रोत्साहन दिलं. त्याच्या प्रोत्साहनानं मी नृत्य, नाट्य, चित्र, भरतकाम, भटकंती, लेखन, कविता - सर्व कला मनसोक्त अनुभवल्या. मी आमच्या दोघांच्या घरकुलात एक सुंदर चित्र काढलं. ते आता हॉस्पिटलमध्ये आहे.

मध्यांतरी मी प्रसिद्ध चित्रकार मिलिंद मुळीक आणि विलास कुलकर्णी यांच्याकडे वॉटर कलर पेंटिंग्जची कार्यशाळा केली. त्यांच्या कुंचल्यांतली जादू पाहण्याचा मनसोक्त आनंद पंधरा दिवस लुटला. तपश्चर्या आहे ती! जमतील तसे रंगांचे खेळ मीही अजमावून पाहिले. मजा आली. रंगांचं पॅलेट जरा घाण झालं की धुऊन स्वच्छ करावं असं आपल्याला वाटतं... पण त्यांचं पॅलेट इतक्या कळकट रंगांनी वर्षानुवर्षं माखलेलं होतं आणि तरीही त्यातून उत्तमोत्तम कलाकृती निर्माण होताना मी पहिल्या. कोणताही रंग वाइट नसतो आणि वायाही जात नाही हे तेव्हा समजलं. त्यानंतर मी, किरण, मुलं सिंहगड, पाबेघाट अशा ठिकाणी गेलो आणि तिथली लँडस्केप्स पेंट केली. अगदी उत्तम नाही जमली... पण आनंद खूप मिळाला.

घरात दोन मोठ्ठे ग्लास पेंटिंग्ज केले. ते घरी येणाऱ्या मंडळींचं आकर्षण ठरलं. लोक आले की, आता नवीन काय केलंस? असं विचारतच घरात प्रवेश करत, कौतुक करत. मग ओरिसाचं पट्टाचित्र शिकले. आता लॉकडाऊनमध्ये मधुबनी ही बिहारची चित्रकला शिकली. एकदा अंब्रेला पेंटिंग केलं.

भाचीच्या बारशाला आठ बाय पाचचा मोठ्ठा बॅकड्रॉप केला, मामेबहिणीला जुळं झालं तेव्हा सहा बाय चारचा बॅकड्रॉप ज्यावर



कोंबडी आणि तिची पाचसहा पिल्लं काढली होती. बहिणी आणि वहिनी यांची डोहाळजेवणं अविस्मरणीय केली. त्या वेळी परिजातकाच्या झाडावर किंवा मोठ्ठ्या फुलपाखरावर किंवा हत्तीवर बसून डोहाळजेवण केलं. त्यांची हौस झाली आणि भाव मात्र मी खाल्ला.

बाबांच्या साठीला त्यांच्याबरोबर आम्ही भावंडं अशी चित्रं काढली. माझ्या काढलेल्या चित्रांचे बॅकड्रॉप त्या-त्या कार्यक्रमाचे हायलाइट्स होते. विविध कार्यक्रमांत चित्रं काढण्यासाठी अगदी आधीच तशी ऑर्डर असायची मला! याशिवाय गोंड, वारली, शेखवती, तंजावर अशा अनेक प्रकारच्या चित्रकला भारतात पाहायला मिळतात. किती आणि काय काय शिकू, काढू... मन अगदी उसळ्या मारतं!

कलेचा हा अथांग सागर अमर्याद आहे.

आम्ही पॅरिसला गेलो तेव्हा तिथे मोंऽमात्र (Montmartre) या ठिकाणी एका टेकडीवर जगातले कलाकार येतात आणि पर्यटकांची, निसर्गाची चित्रं पाहता-पाहता साकारतात आणि विकतातही! विविध वाद्यं घेऊन आर्टिस्ट येतात, आपली कला सादर करतात, लोक त्यांना बक्षिसी देतात! त्यांची स्पेशल एम्ब्रॉयडरी, तिथली हस्तकला यांची लयलूट असते आणि खाद्यजत्रा तर असतेच! तिथे आम्ही एका इटालिअन आर्टिस्टकडून माझंही पोर्ट्रेट काढून घेतलं. छानच काढलं होतं... पण त्याला युरोपिअन लूक होता. तासाभरात अगदी हुबेहूब व्यक्तिचित्रं काढणाऱ्या या कलाकारांचं मला नेहमीच अप्रूप वाटायचं. मानलं पाहिजे बुवा!

लॉकडाऊनच्या या दिवसांत माझं हे चित्रप्रेम पुन्हा एकदा बहरलं... पण घरात रंग नव्हते. जे होते ते वाळून गेले होते. मग कागद आणि पेन्सिल ही दोनच हत्यारं हाताशी होती म्हणून पोर्ट्रेट



काढून बघण्याचं मी  धाडस केलं. एक काढलं, बरं जमलं, मग दुसरं! तिसरं थोड्या धाडसानं किरणचं काढलं. नॉट बॅड... मग डॉ. मंदार, नंदिनी, आमची मुलं यांची पोर्ट्रेट्स काढली.

किरणच्या आई म्हणजे माझ्या सासूबाई दोनचार वेळा म्हणाल्या 'माझं काढ ना...' प्रत्येक चित्रात प्रगती दिसत होती. तसा माझा आत्मविश्वास वाढत होता आणि मला मिळणारा आनंद दुप्पट होत होता! मग धाडसानं सासूबाईंचं पोर्ट्रेट काढलं. ते पाहून त्या स्वतः इतक्या खूश झाल्या आणि मला मोठ्ठंच बक्षीस मिळालं! आता मात्र काढू ते पोर्ट्रेट छानच होईल याची खात्री वाटायला लागली.

चित्रकलेतलं 'हे' अंग आपल्याला जमणार नाही म्हणून मी कधी प्रयत्नसुद्धा केला नव्हता... पण हा करोना लॉकडाऊन नव्या संधी घेऊन आला आणि अविस्मरणीय होऊन गेला. प्रेरणा आणि प्रयत्न यांची परिणती  पारितोषिकात झाली की परमोच्च प्रमोद प्राप्त होतो याचा प्रत्यक्ष प्रत्यय आला हे पक्कं! एकएक रेष काढताना समोरची व्यक्ती कशी हुबेहूब साकारत जाते हे अनुभवतानाचा मनोल्हास खरोखरच शब्दातीत आहे. आता मला चैन पडत नाही. आता कुणाचे पोर्ट्रेट काढायचे याचा शोध मी रोज घेत असते. अजून वॉटर कलर पेंटिंग, नाईफ पेंटिंग्ज ऑन कॅनव्हास, म्युरल्स  असं खूप काही करायचंय !

आपल्या माणसांनी, मित्रमंडळींनी  केलेलं  कौतुक हाच स्फूर्तीचा स्रोत असतो. मी काही कुणी मोठी चित्रकार नाही... पण हा छंद मला अत्युच्च आनंद आणि समाधान देत राहतो... म्हणून म्हणते... एक तरी छंद जोपासावा.

# These days will also pass...

**- Rtn. Arvind Shiralkar**

Due to Corona, the whole world seems to have come to a standstill.

It was out of everyone's imagination.

Naturally, the whole world is under tension and routine life has been totally disturbed. But dear friends, in this world nothing is stationery but we are always going ahead with new weapons to combat.

World scientists including India, are working hard to find either vaccine or at least effective medicines.

The world cannot hang timelessly. Some vaccines seem to be ready in a short time, whereas news of some medicines with definite cure has also been announced including one from Ayurvedic Com of India There is also news from the UK  which claimed it to be the first drug to significantly reduce the risk of death among severe COVID-19 cases.

The trial results are being hailed as a major breakthrough.There is also news of some medicine from another country.

There is definite hope to think that everything shall go back to normal very soon.

All of us should have a little patience and positive thinking. Be cheerful n happy. We pray and hope everything will be fine and the world will go back to normal and routine life will resume very soon.

All the very best and take care in the meantime. With the beginning of monsoon, prosperity and happiness will also thrive.

# मृद्‌गंध

## अद्वैत

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत पाऊस हा साठलेला

कोसळेल तो धबाबा, मन होईल सैरभैर
भिजतील गात्रे अन् मन होईल चिंबचिंब

आठवीत त्या भेटी, उभी राधा, समोर सांध्यरंग
हातात हात, कुजबुज कानात, डोळे स्वप्नी दंग

अशातच सुटला पिसाट वारा अंधारल्या दाही दिशा
येईल झणी तो, विसावेन मिठीत, ही वेडी आशा

अजून नाही आला तो, पाऊस कोसळे दाही वाटे
भिजली राधा, भिजले तनमन, हुरहुर वेगळीच दाटे

बावरी राधा, समजली का नाही त्याचा इशारा
उमगताच त्याचा कावा शहारले अंग, फुलला शृंगार सारा

समजले मज का नाही गूढ त्याचे इशारे
कृष्ण माझा प्राणसखा व्यापून राही विश्व सारे

भिजू लागली राधा उमगताच सारे
व्यापून राही सर्व चराचर, अद्वैत असे हे न्यारे

अंधार तोच, कृष्णमेघही तोच
मृद्गंध तोच अन् वर्षावही तोच

रो. रवींद्र प्रभुणे

## विनवणी...

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला,
इशाऱ्याची वाट बघत पाऊस साठलेला..

टपटप थेंब पावसाचे करिती तृप्त चातकाला
तसाच शेतकरी असे पावसास आतुरलेला...

विनंती पावसा तुला रे दमाने पड आता
कूस उजवू दे धरित्रीची, अंकुरू दे बीजाला...

दडी मारू नकोस ऐशी जाळू नको पिकाला
भिस्त बळीराजाची तुजवरी तो आळवितो तुजला...

वाट पाहती नेत्र हे अशाच भीज पावसाची,
जो सुखावेल बळीराजाला अन् शमवेल वसुंधरेला...!

ॲन अंजली देवधर

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला,
इशाऱ्याची वाट बघत पाऊस साठलेला...

भक्ती रसाने वारकरी असे ओतप्रोत भरलेला,
त्यास भेटण्या आतुर विठूही, पंढरीस ठाकलेला...

धीर ठेव रे मेघराजा कळस दिसत नाही तोवर
न जाणो कधी ह्या आभाळास पडेल विवर...

कटेवरी ठेवुनी कर अन् नजर त्याची वर
काय बिशाद त्या जलदाची पाडण्याची सर...

अनभिज्ञ वारकरी न जाणे, हुकमत येथे कोणाची,
वाट पाहे जलद फक्त विठुरायाच्या इशाऱ्याची...!

ॲन अंजली देवधर

## काहूर...

वेडावणारा मृद्गंध आणि
काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत
पाऊस हा साठलेला ॥१॥

तुझ्या आठवांचे मेघ आणि
स्मृतींची ही सय
अर्ध्यावर सुटला हात
माझा श्वास कोंडलेला ॥२॥

क्षण एक जग थांबेना
तुजवीण मज आकळेना
विस्मरेना प्रीती तुझी
नेत्री पूर दाटलेला ॥३॥

आता सहप्रवासी नवीन
सुस्वभावी आणि प्रेमळ
इशाऱ्याची वाट बघत
तोही आसुसलेला ॥४॥

वेडावणारा मृद्गंध आणि
काळोख दाटलेला
माझ्या मनी जणू हा
काहूर माजलेला ॥५॥

ॲन डॉ. गीतांजली पुरोहित

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला...
इशाऱ्याची वाट बघत, पाऊस हा साठलेला...!

नदीकिनारी झाडामागे, चंद्रही भागलेला...
गाई गुजी ही अस्वस्थ, गोठा गप्प झालेला...!

थवा पक्ष्यांचा घरट्यात, किलबिल विसरलेला...
तरूवेली न हलती, वाराही ओठंगलेला...!

निसर्ग सारा स्तब्ध पण प्रतीक्षा वाढलेली...
उत्सुक अन् व्याकुळतेने चरमसीमा गाठलेली...!

अलगद अंतराळात धून काही उमटली...
खोल अशा अंतरात, खूणगाठ पटलेली...!

तहानलेल्या धरतीला, संकेत हा कळलेला...
येईल सावळा घेऊन आता, प्रकाश हा आटलेला...!

हळुवार त्या लकेरीने, न कळे कोणती कळ फिरवली...
कान्हा असा बरसला की, धरती धुंदलेली...!

ॲन मोहिनी नातू

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत पाऊस हा साठलेला
बावरली राधा व्याकुळ
मिलनास पुन्हा
भिजवीत काळ जावा
मुरलीने कान्हा

ॲन डॉ. विजया गुजराथी

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत पाऊस हा साठलेला

रातराणीच्या गंधाने आसमंत सारा भारलेला
पाऊसओल्या आठवणींचा जलसा साकारलेला

आतुरलेल्या सृष्टीचा कण अन् कण मोहरलेला
क्षणाक्षणात अन् मनामनात पूरिया बहरलेला

जादूई स्पर्शाने खुलला निसर्ग आजवर कोपलेला
अशा वेळी कोण करंटा पांघरूण ओढून झोपलेला

रो. अभिजित जोग

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला।
इशाऱ्याची वाट बघत पाऊस साठलेला।
वाटे मला तू ओली माझ्या मिठीत यावी।
मदमस्त शृंगाराची मग वीज कडकडावी।

रो. डॉ. सुभाष देशपांडे

## जलधारा

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत पाऊस हा साठलेला
करता इशारा त्याला
हुलकावणी देऊ लागला
सख्याची शपथ घालता
अलगद बरसू लागला
ओंजळी घेता धारा
जणू सखाच भेटला मजला
सय सख्याची येता
मन चिंब भिजवून गेला

ॲन अस्मिता आपटे

वेडावणारा मृद्गंध आणि काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत पाऊस हा साठलेला
मला आठवला लगेच
इन्व्हर्टर बॅटरी संपलेला
आणि रेनकोट फाटलेला

रो. अभिजित देशपांडे

वेडावणारा मृद्गंध
अन् काळोख दाटलेला
इशाऱ्याची वाट बघत
पाऊस हा दाटलेला ।।१।।

पक्षी गेले घरट्यात
गुरे आपल्या गोठ्यात
आसमंत चिडीचूप
एका अनोख्या जगात ।।२।।

दूरवर कोठेतरी
वीज चमकून जाई
मेघ कडाडे अंबरी
जीव मेटाकुटी होई ।।३।।

जग सारे हे नि:शब्द
झाडे ही झाली मूक
ओथंबल्या या मेघाला
धराभेटीची लागे ओढ ।।४।।

आसावली धुंदावली
गंधाळली सारी धरा
एकलीच राहिले मी
सांग, कधी येशी घरा? ।।५।।

रो. श्वेता करंदीकर

ॲन मोहिनी नातू यांच्या कवितेचं वाचन
त्यांच्या बंधूंच्या आवाजात...

आपल्या क्लबचे दोन जाणते सदस्य
रो. सदानंद महाजन आणि ॲन प्रियदर्शनी अंबिके
या दोघांनी परीक्षक म्हणून या सर्व कविता वाचून
१ ॲन मोहिनी नातू
२ रो. अभिजित जोग
३ रो. श्वेता करंदीकर
या तिघांना बक्षीसपात्र जाहीर केलं आहे. तसंच
१ रो. रवींद्र प्रभुणे
२ ॲन डॉ. गीतांजली पुरोहित
या दोघांना उत्तेजनार्थ बक्षीसपात्र कविता म्हणून जाहीर केलं आहे.

**सर्वांचं अभिनंदन!**

या थोड्याशा वेगळ्या कल्पनेला तुम्ही दिलेला प्रतिसाद आम्हाला ऊर्जा देऊन गेला.

**धन्यवाद...!**





हे सदर इ-बुलेटिनमध्ये वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा...

# दृष्टिकोन

## पुस्तक परिचय

- रो. योगेंद्र नातू




बूम कंट्री?

लेखक - लन रोजलिंग

अनुवाद - पूनम छत्रे

प्रकाशन - मनोविकास प्रकाशन

किंमत - ३५० रुपये

भारतीय व्यवसायामध्ये निश्चित आणि कायमस्वरूपी बदल कसा होऊ घातलाय... याचा शोध लन रॉजलिंग यांनी 'बूम कंट्री' या पुस्तकात घेतलाय.

उद्योजक आणि गुंतवणूक सल्लागार म्हणून त्यांनी पस्तीस वर्षं काम केलंय... तेही भारतात... त्यामुळे त्यांच्या या शोधपूर्वक लेखनाला विशेष महत्त्व आहे... आघाडीच्या जवळजवळ शंभरहून अधिक उद्योजकांच्या मुलाखती त्यांनी या शोधकामाकरता घेतल्या आहेत....

त्यांतलीच एक म्हणजे शशांक. एन. डी. शशांक हे 'प्रॅक्टो' या कंपनीचे संस्थापक आहेत. डॉक्टरांना त्यांच्या व्यवसायाचं व्यवस्थापन करण्यासाठी ही कंपनी मदत करते. दोन लाख डॉक्टर्स या सेवेचा लाभ घेतात. मुख्य म्हणजे या सेवेमुळे नवीन डॉक्टर्सना पेशंट मिळवणं सहजशक्य होतं.

'मु सिग्मा' या कंपनीच्या धीरज राजाराम यांचं उदाहरण अगदी वेगळं... त्यांनी व्यवसायाचा पूर्णपणे नव्यानं विचार केला... ते म्हणतात... 'आपण फक्त 'मेक इन इंडिया'बद्दलच का बोलतो? 'थॉट इन इंडिया'च्या पायरीवर जायला हवं...'

'मिल्टेक' ही कंपनी आर. रवींद्रनाथनं १९९८मध्ये सुरू केली. ही मिल भारतातल्या आघाडीच्या राइस मिल्सपैकी एक आहे... आयात केलेली 'ब्ह्यूलर' ही मिल आपल्याकडच्या उकड्या तांदळावर काम करायला योग्य नव्हती... रवींद्रनाथनं ग्राइंडरमध्ये हवे ते बदल करून भारतीय तांदळाला सोयीची होईल अशी राईस मिल बनवली.

अशी अनेक उदाहरणं आपल्याला या पुस्तकात सापडतात... भारतीय जीवनाच्या सर्व अंगांना स्पर्श करणारे विविध उद्योग आणि त्यात भारतीय वापराकरता लागणारे बदल... अशी सर्व माहिती त्यानं केलेल्या शोधकार्यामुळे आपल्याला मिळते... एका ब्रिटिश माणसानं भारतीय उद्योग-व्यवसायाबद्दल खूप खोलात जाऊन, माहिती मिळवून लिहिलेलं हे पुस्तक म्हणूनच अत्यंत वाचनीय....




हे सदर इ-बुलेटिनमध्ये वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा...

# विशेष


## रोटरी फॉउंडेशन

रोटरी क्लब ऑफ पुणे साऊथच्या सुवर्ण महोत्सवी (२०१९ - २०२०) वर्षात
रोटरी फाउंडेशनला देणगी देणारे मानकरी...
मन:पूर्वक अभिनंदन!

- विनोद अगरवाल
(डायरेक्टर फाउंडेशन, २०१९-२०२०)

* Joag Abhijit Sharadchandra - US4350
* Ogale Sneha Sanjeev - US2014
* Kudale Suraj Sangram - US1000
* Natu Sudarshan V. - US1000
* Ambike Priyadarshani Mandar - US300
* Apte Asmita Vilas - US300
* Apte Vilas Vasudev - US300
* Kirpekar Madhuri Uday - US300
* Parulkar Rashmi Subhash - US300
* Ponkshe Raghvendra Satyawrat-US300
* Prabhune Ravindra Ramchandra - US300
* Ruhi Naynesh  Pooja Shah - US300
* Shiralkar Swati Arvind - US300
* Walimbe Hemant Madhukar - US300
* Prabhumirashi Ramesh S. - US175

## टीम बुलेटिन



| | | |
|---|---|---|
| मुखपृष्ठ | श्वेता | विधानं / कोट्स |
| संपादकीय / अध्यक्षीय | योगेश / सुदर्शन | |
| रोटरी | योगेंद्र / अभिजित | रोटरी मंथ / RI |
| डिस्ट्रिक कनेक्ट | योगेंद्र / अभिजित | डिस्ट्रिक्ट घडामोडी |
| क्लबकारी | आनंद / यामिनी | क्लब घडामोडी |
| कलाकारी | आनंद / यामिनी | सभासद गुणदर्शन |
| दृष्टिकोन | योगेंद्र / अभिजित | पुस्तक, चित्रपट इ... |
| विशेष | श्वेता | शुभेच्छा, स्मृती |



हे सदर इ-बुलेटिनमध्ये वाचण्यासाठी QR कोड स्कॅन करा...

क्रिएटिव्ह असिस्टन्स आणि कोऑर्डिनेशन
सहयोगी - उल्का पासलकर